# हे वाचलेत का?


## पुस्तक टिप्पणी

## A SIXTH OF HUMANITY: INDEPENDENT INDIA'S DEVELOPMENT ODYSSEY

*केरळमध्ये कार्यरत असलेले पर्यावरणवादी के. सहदेवन यांची एक पोस्ट होती, एका पुस्तकाबद्दल. त्यांनी जे मांडले आहे, ते आपण सगळ्यांनी विचार करण्यासारखे वाटले, म्हणून हा अनुवाद पुढे देत आहे.*

**पुस्तक टिपणी :** A Sixth of Humanity: Independent India's Development Odyssey: लेखक - अर्थतज्ञ अरविंद सुब्रमण्यन आणि देवेश कपूर.

हे ८०० पानांचे वजनदार पुस्तक अधिकारवाणीने जे मांडते आहे, त्याचे मर्म




थोडक्यात कसे सांगावे? मला रॉबर्ट केनेडी यांच्या भाषणाची आठवण आली. १९६८ मध्ये अध्यक्षपदासाठीच्या प्रचारादरम्यान त्यांनी हे भाषण केले होते. काही दिवसातच त्यांची हत्या झाली होती.

"धनसंपत्ती गोळा करण्याच्या भरात आपण पुष्कळ सारे विसरून गेलेलो आहोत. मानवी सद्गुण आणि सामाजिक नीतीमूल्ये आपण संपत्तीच्या पायी वाहून टाकली आहेत. आपले सकल राष्ट्रीय उत्पादन... त्यामध्ये आपण काय काय धरतो? मेलेल्या माणसांना उचलून नेणाऱ्या

ॲम्बुलन्स, हवा प्रदूषण आणि सिगारेटच्या जाहिराती, कुलुपे आणि ती फोडून चोऱ्या करणाऱ्यांसाठी असलेले तुरुंग, जंगल नष्ट करून लाकूडव्यापार, निसर्ग नष्ट करून माजवलेला पसारा...

तरीही आपले सकल राष्ट्रीय उत्पादन मुलांचे आरोग्य, त्यांच्या शिक्षणाचा दर्जा, त्यांचा खेळण्याचा आनंद यासाठी काहीही शिल्लक ठेवत नाही, जागा देत नाही. काव्यामधले सौंदर्य, कुटुंबाची ताकद, लोकांमध्ये चालू असलेल्या चर्चांची बौद्धिक पातळी, सरकारी अधिकाऱ्यांची विवेकबुद्धी यांचा त्यात समावेश नाही. आपली अक्कल, धैर्य, करुणा, अनुभवाने झालेले शिकणे, देशाप्रती निष्ठा यातल्या कशाचीही यात गणना नाही. खरे तर आयुष्य ज्या गोष्टींमुळे जगण्यासारखे होते, ते सोडून सगळे काही मोजले जाते.... ”

मानवजातीच्या एक षष्ठांशाचा ७५ वर्षांचा विकासानुभव तपासून बघताना या पुस्तकात ही वर दिलेली सावधगिरीची सूचना नसून जणू कामकाजपद्धतीचा हुकूमच असावा, असे गृहीत धरल्याचे दिसते.

पुस्तकात सर्व आर्थिक निर्देशक अगदी व्यवस्थित नोंदवलेले आहेत, मात्र मानवी जीवनासाठी लागणाऱ्या - केनेडींनी उल्लेख केलेल्या गोष्टींकडे जाणूनबुजून पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. खाउजा(खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण)नंतर भारतीय विकासक्रमाचे जे वाईट परिणाम झाले, ते तर झाकूनच टाकले आहेत.

भारतात दरडोई उपलब्ध कार्बनस्पेस कशी संपत गेली, गोडे पाणी कसे संपत गेले-प्रदूषित झाले, सुपीक मातीचा थर नष्ट झाला, हवेची अवस्था बहुतेक शहरांमध्ये मरणाची

वाईट झाली, आर्थिक सामाजिक विषमता वाढली आणि त्यातून निर्माण झालेली रोगिष्ट समाजलक्षणे... या कशाचाही परामर्श इथे घेतलेला नाही.

खरे तर हे काम विद्वत्तापूर्ण आहे. त्याची मर्यादा अशी की त्यांना या सत्याचा सामनाच करायचा नाहीये, की हा जो भव्य विकास त्यांनी दाखवला आहे, तो नैसर्गिक आणि सामाजिक भांडवलाचा पुन्हा कधीही भरून न निघणारा खातमा करून विकत घेतलेला आहे. या भांडवलावरच अस्सल मानवी विकास अवलंबून असतो.

संदर्भ : https://theaidem.com/en-the-mirage-of-global-superpower-in-the-shadow-of-irrationality/

§§§

---

**लेखक : के. सहदेवन,** पर्यावरणवादी आणि अणुविरोधी कार्यकर्ता, पर्यावरण, विकास, ऊर्जा, पर्यावरणाचे अर्थशास्त्र, शेती, अशा विविध विषयांवर लिहितात.

**अनुवाद : नीलिमा सहस्रबुद्धे,** शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** neelimasahasrabudhe@gmail.com

***(कळीचे शब्द :- सकल राष्ट्रीय उत्पादन, खाउजा(खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण), आर्थिक निर्देशक, Gross National Income, LPG (Liberalization, Privatization, Globalization), Economic Indicators)***